PIFF
10th Pune International Film Festival 2012

१८ जानेवारी २०१२

# ऑस्करच्या रेसमधील अबू सन ऑफ ॲडम

ऑस्कर स्पर्धेसाठी झालेला मल्याळम मधील अबू सन ऑफ ॲडम हा तीर्थक्षेत्री जाऊन पैसे मिळवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचे चित्रण करतो. चित्रपटाचे निर्माते आणि दिग्दर्शक सलीम अहमद यांनी या चित्रपटात सत्य परिस्थितीचे चित्रण असल्याचे सांगितले.

गरिबीशी संघर्ष करित असताना परमेश्वराच्या भेटीची आस लागते. असेच केरळातील एक कुटुंब आखाती देशात धार्मिक स्थळी जाते. तेथे जाण्यासाठी त्यांनी केलेली धडपड, त्यासाठी वापरलेले चुकीचे मार्ग आणि जगण्यासाठी त्यांचा संघर्ष याचे चित्रण या चित्रपटात केले आहे.

साध्या व्हिडीओ कॅमेऱ्यावर हा चित्रपट चित्रीत करुन नंतर मोठ्या पडद्यासाठी रुपांतरीत करण्यात आला.कलात्मक पद्धतीने तो चित्रीत झाल्याने पडद्यावर अत्यंत प्रभावी ठरला. या चित्रपटातील प्रमुख कलाकार मुस्लिम नसल्याने त्यांना प्रत्यक्ष हज यात्रेस जाता आले नाही. म्हणून त्यांनी दोन गरीब व्यक्तींना स्वखर्चाने पाठवून त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाचा वापर चित्रपटात अभिनय करण्यासाठी केला.

हा कलात्मक चित्रपट असला तरी केरळमध्ये त्याचे मोठ्या प्रमाणात स्वागत झाले आहे. चित्रपटासाठी खर्च झालेले एक कोटी रुपये वसूल झाले आहेत. ऑस्कर स्पर्धेसाठी चित्रपटाच्या तांत्रिक बाजू अधिक विकसित करण्यात आल्या आहेत. ऑस्करसाठी जो जनसंपर्क प्रस्थापित करावा लागतो तोही केला आहे.

आता एक व्यावसायिक चित्रपट तयार करण्याचा अहमद यांचा मानस असून भूमिकेसाठी मामुट्टी यांच्यासारख्या कलाकाराची गरज असली तरिही आपण त्यासाठी प्रयत्न करु असे ते म्हणाले.

आपला स्नेहांकित,

प्रवीण प्र. वाळिंबे

प्रवीण प्र. वाळिंबे
मीडिया को-ऑर्डिनेटर
९८२२४५४२३४ / ९४०५०३५४५८

Pune Marathon Bhavan, Near Mitra Mandal Colony, Opp. Parvati P. O.,
Pune - 411009, India. Tel: +91 20 24424545, Fax: +91 20 24428788,
Email: piff.india@gmail.com Website: www.puneinternationalfilmfestival.com
R. No. : F - 24914 / Pune S/R. No. : MAH / 1325 / 2009 / Pune

ORGANIZED BY
Pune Film Foundation
JOINTLY WITH
Government of Maharashtra